Kotak Mahindra Capital Company Limited 1st Floor, 27 BKC, Plot No. 27, 'G' Block, Bandra Kurla Complex, Bandra (East) Mumbai - 400 051, Maharashtra, India **Tel:** +91 22 4336 0000 **E-mail:** bharatfih.ipo@kotak.com **Website:** www.investmentbank.kotak.com **Investor Grievance E-mail:** kmccredressal@kotak.com **Contact Person:** Ganesh Rane **SEBI Registration No.:** INM000008704	**Citigroup Global Markets India Private Limited** 1202, 12th Floor, First International Financial Centre, G-Block, C54 & 55, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400 098 Maharashtra, India **Tel:** +91 22 6175 9999 **E-mail:** bharatfih.ipo@citi.com **Website:** www.online.citibank.co.in/rhtm/citigroupglobalscreen1.htm **Investor Grievance E-mail:** investors.cgmib@citi.com **Contact Person:** Mubeen Uttanwala **SEBI Registration No.:** INM000010718	**BNP Paribas** 1 North Avenue, Maker Maxity, Bandra Kurla Complex, Bandra (East) Mumbai - 400 051, Maharashtra, India **Tel:** +91 22 3370 4000 **E-mail:** dl.ipo.bharatfih@asia.bnpparibas.com **Website:** www.bnpparibas.co.in **Investor Grievance E-mail:** indiainvestors.care@asia.bnpparibas.com **Contact Person:** Soumya Guha **SEBI Registration No.:** INM000011534	**HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited** 52/60, Mahatma Gandhi Road, Fort Mumbai - 400 001, Maharashtra, India **Tel:** +91 22 2268 5555 **E-mail:** bharatfihipo2021@hsbc.co.in **Website:** www.business.hsbc.co.in/engb/in/generic/ipo-open-offer-and-buyback **Investor Grievance E-mail:** investorgrievance@hsbc.co.in **Contact Person:** Sanjana Maniar / Rachit Rajgaria **SEBI Registration No.:** INM000010353	**KFin Technologies Limited** Selenium, Tower B, Plot No. 31-32 Financial District, Nanakramguda, Hyderabad, Rangareddi - 500 032 Telangana, India **Tel:** + 91 40 6716 2222 **E-mail:** bharatfih.ipo@kfintech.com **Website:** www.kfintech.com **Investor Grievance e-mail:** einward.ris@kfintech.com **Contact Person:** M. Murali Krishna **SEBI Registration No.:** INR000000221

All capitalised terms used herein but not separately defined shall, unless the context otherwise requires, have the meaning ascribed to them in the Draft Red Herring Prospectus and the Addendum, as applicable.

For and on behalf of Bharat FIH Limited

Place: Chennai
Date: 21 June 2022

Sd/-
Chief Financial Officer, Company Secretary and Compliance Officer

BHARAT FIH LIMITED is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its Equity Shares and has filed the Draft Red Herring Prospectus dated 21 December 2021 with SEBI. The Draft Red Herring Prospectus is, and the Addendum shall be, available on the website of SEBI at www.sebi.gov.in, websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com, respectively, and on the websites of the BRLMs, i.e. Kotak Mahindra Capital Company Limited, Citigroup Global Markets India Private Limited, BNP Paribas and HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited at www.investmentbank.kotak.com, www.online.citibank.co.in/rhtm/citigroupglobalscreen1.htm, www.bnpparibas.co.in and www.business.hsbc.co.in/engb/in/generic/ipo-open-offer-and-buyback, respectively. Investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to such risk, refer to the Red Herring Prospectus, including the section titled "Risk Factors" of the Red Herring Prospectus when available. Potential investors should not rely on the Draft Red Herring Prospectus (together with the Addendum) filed with SEBI for making any investment decision. Specific attention of the investors is invited to "***Risk Factors***" beginning on page 25 of the Draft Red Herring Prospectus.

Adfactors 124

पश्चिम महाराष्ट्रातील पाचही आमदार बंडात

दिगंबर शिंदे, लोकसत्ता

सांगली : पक्ष नेतृत्वाकडून होत असलेली उपेक्षा, सत्तेत सहभागी असलेल्या राष्ट्रवादीकडून होणारी कोंडी, निधी मिळण्यात होणारा दुजाभाव आणि या सर्व पार्श्वभूमीवर पक्षनेतृत्वाकडून सुरू असलेला विसंवाद यामुळे गेले अनेक दिवस पश्चिम महाराष्ट्रातील पाचही शिवसेनेच्या आमदारांनी एकनाथ शिंदेच्या नेतृत्वाखाली बंडाची दिशा पकडल्याचे मानले जात आहे.

गृह राज्यमंत्री असलेल्या शंभूराज देसाई यांच्यासह खानापूरचे अनिल बाबर, कोरेगावचे महेश शिंदे, सांगोल्याचे शहाजी बापू पाटील, गडहिंग्लजचे प्रकाश आबिटकर हे या बंडात सहभागी झाल्याचे समजते आहे. या सर्वच आमदारांशी आज सकाळपासून संपर्क तुटलेला आहे. महायुतीच्या नेतृत्वाखाली २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रातून शंभूराज देसाई (पाटण), अनिल बाबर (खानापूर), महेश शिंदे (कोरेगाव), शहाजी बापू पाटील (सांगोला) प्रकाश आबिटकर (गडहिंग्लज) हे शिवसेनेचे पाच आमदार निवडून आले. परंतु यातील बाबर, शिंदे आणि शहाजी पाटील हे तीन आमदार तसे मूळचे भाजपच्या संपर्कातील होते. परंतु जागा वाटपात हे मतदारसंघ शिवसेनेकडे गेल्याने त्यांना निवडणूक शिवसेनेकडून लढवावी लागली होती. मात्र निवडणुकीनंतर सत्ता स्थापन करताना शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत घरोबा केल्याने हे आमदार सुरुवातीपासूनच मनाने या सरकारमध्ये सहभागी झालेले नव्हते.

महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर या सरकारवर राष्ट्रवादीचेच मोठे वर्चस्व सुरुवातीपासून दिसून आले. या वर्चस्ववादातून आघाडीत शिवसेनेच्या आमदारांचीच मोठी कोंडी होत होती. निधी न मिळणे, स्थानिक पातळीवर मतदारसंघात विरोधकांना काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून बळ मिळणे, मुख्यमंत्री असलेल्या पक्ष नेतृत्वाला याबाबत सांगण्याचा प्रयत्न केल्यानंतरही त्यासाठी वेळ न मिळणे, संवाद न घडणे हे असे प्रकार वारंवार घडू लागल्याने हे सर्व आमदार अस्वस्थ होते.

उपेक्षेबाबत बाबर, शिंदे आणि शहाजी पाटील यांनी तर जाहीररीत्या अनेकदा आपली नाराजी व्यक्त केली. हे सरकार आपले वाटत नसल्याचे वेळोवेळी बोलून दाखवले. मात्र या नाराजी नाट्यानंतरही शिवसेनेने आपल्या आमदारांच्या या अस्वस्थतेची दखल घेतली नाही.

गेल्या महिन्यात शेतकरी मेळाव्याच्या निमित्ताने आटपाडीत पश्चिम महाराष्ट्रातील हे सर्व उपेक्षित आमदार एकत्र आले होते. त्यांनी ज्येष्ठ मंत्री एकनाथ शिंदे व शंभूराज देसाई यांच्यासमोर ही खदखद व्यक्त केली. आम्ही सरकारमध्ये आहोत, पण सरकार आमचे वाटत नाही असे स्पष्टपणे बाबर, पाटील यांनी सांगितले. यातूनच शिवसंवाद अभियानही पुढे आले. पण तोवर आमदार आणि पक्ष नेतृत्व यांच्यात मोठी दरी तयार झालेली होती.

शेतकऱ्यांना खते, औषधे खरेदी करण्याची सक्ती

कंपन्या, वितरकांवर कारवाईची खासदार कोल्हे यांची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : शेतकऱ्यांना युरिया खते खरेदी करताना इतर खते व औषधे खरेदी करण्याची सक्ती संबंधित कंपन्या आणि वितरकांकडून होत आहे, असे सांगत अशाप्रकारे सक्ती करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

खासदार कोल्हे यांनी यासंदर्भात राज्याचे कृषी आयुक्त धीरज कुमार यांना एक पत्र दिले आहे.

खरीप हंगामासाठी युरिया खताबरोबर इतर खते व औषधे खरेदी करण्याची सक्ती करण्यात येत आहे. वाहतूक भाडेही शेतकऱ्यांकडूनच वसूल करण्यात येत आहे. ही सक्ती कंपन्यांकडून होत असल्याची सारवासारव दुकानदार करत आहेत.

या सर्व प्रकाराविषयी शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. आवश्यकता नसताना खते व औषधांची खरेदी केल्याने नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागतोच आहे, त्या खतांचा व औषधांचा वापरही होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर अशाप्रकारे सक्ती करणाऱ्या कंपन्या व वितरकांवर तत्काळ कारवाई करावी. कोणाची तक्रार येण्याची वाट न पाहता कृषी आयुक्तांनी स्वतःहून या प्रकाराची चौकशी करावी, अशी मागणी खासदार कोल्हे यांनी केली आहे.

कोथरूडमध्ये ज्येष्ठ नागरिकाला लुटून नाल्यात ढकलले; चोरट्यांचा शोध सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून त्यांना नाल्यात ढकलून देण्यात आल्याची घटना कर्वे रस्त्यावर मृत्युंजयेश्वर मंदिराजवळ मंगळवारी दुपारी घडली. या घटनेत ज्येष्ठ नागरिक जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पसार झालेल्या चोरट्यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

कोथरूडमधील मृत्युंजयेश्वर मंदिर परिसरातील एका सोसायटीत ज्येष्ठ नागरिक राहायला आहेत. मंगळवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास ते सोसायटीच्या परिसरातून जात होते. कर्वे रस्त्यावरील मृत्युंजयेश्वर मंदिराजवळ त्यांना चोरट्यांनी गाठले. धक्काबुक्की करून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी हिसकावली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना नाल्यात ढकलले. नाल्याला कठडा नसल्याने ते सात फूट उंचीवरून नाल्यात पडले. या घटनेत त्यांना फ्रॅक्चर झाले. या भागातील एका सोसायटीतील रहिवाशी नागेशकुमार नलावडे तसेच कर्वे रस्त्यावर टेम्पो चालकांच्या लक्षात लूटमारीचा प्रकार आला.

नलावडे यांनी त्वरित या घटनेची माहिती कोथरूड पोलीस तसेच अग्निशमन दलाला दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी स्ट्रेचरचा वापर करून त्यांना नाल्यातून बाहेर काढले. नलावडे आणि टेम्पो चालकांनी आरडाओरडा केला. त्यांनी चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला,मात्र तोपर्यंत चोरटे नाल्यातून पसार झाले होते.

संस्कृतच्या ज्येष्ठ अभ्यासक सुनीती दुबळे यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी



पुणे : संस्कृत आणि संतसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक सुनीती मोरेश्वर दुबळे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे तीन मुली आणि मुलगा असा परिवार आहे. ज्येष्ठ गायक पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य समीर दुबळे हे त्यांचे पुत्र होत.

सुनीती दुबळे यांनी डेक्कन कॉलेज येथे संशोधन प्रकल्पासाठी काम केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागामध्ये त्यांनी १२ वर्षे अध्यापन कार्य केले. अलंकारशास्त्र विषयाचा त्यांचा गाढा अभ्यास होता. ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या संस्कृत संस्कृति संशोधिका येथे त्यांनी काम केले होते. त्या स्वामी माधवनाथ यांच्या शिष्या होत्या. मातोश्री सरलाताई यांचं चरित्रलेखन त्यांनी केले होते. तसेच स्वामीजींच्या काही ग्रंथांचे त्यांनी भाषांतर केले होते. ज्ञानेश्वरी, दासबोध, श्रीमद्भागवत या ग्रंथांवर त्या प्रवचन देत असत.

निवृत्त गायन शिक्षिका कुमुद भट यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी



पुणे : हुजूरपागा प्रशालेतील सेवानिवृत्त गायन शिक्षिका कुमुद रवींद्र भट (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. ज्येष्ठ साहित्यिक व संतसाहित्याचे अभ्यासक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी प्रमुख कार्यवाह स्वर्गीय रवींद्र भट यांच्या त्या पत्नी होत.

गायन शिक्षिका कुमुद भट प्रशालेतील विद्यार्थिनींमध्ये लोकप्रिय होत्या. निवृत्तीनंतरही त्या गाण्याच्या शिकवण्या घेत असत. रवींद्र भट यांच्यासमवेत त्या 'मोगरा फुलला' आणि 'इंद्रायणी काठी' हे भक्तिसंगीताचे कार्यक्रम करत असत.

साऊथ इंडियन बँक
सुरुश्याम हाइट्स, आळंदी रोड पोलीस स्टेशनच्या पुढे, विश्रांतवाडी, पुणे - 411006, फोन. : 8669960771

सोन्याचे लिलाव सूचना

ऋण क्र.	नाव	शुध्द वजन (ग्राम मध्ये)
0771.653.1119	प्रतिक एच बेंद्रे	46.500

शुक्रवार दुपारी 2.00 वाजता दि. 01-07-2022 रोजी बँक आवारात सोन्याचे लिलाव घेण्यात येणार आहे. लिलावात भाग घेऊ इच्छिणा-यांनी रु. 1000/- दि. 01-07-2022 रोजी दुपारी 1.00 च्या आधी जमा करावे.

ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड
मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई, महाराष्ट्र-400025.
ई-मेल: info@ahfcl.com सीआयएन: यू65923एमएच2013पीएलसी248741

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

निम्न स्वाक्षरीकर्ता, 'ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड'चे प्राधिकृत अधिकारी याद्वारे आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि हितसंबंध सुरक्षा कायदा 2002 अंमलबजावणी)चा नियम 8(1)सह सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी नियम 2002 चा नियम 8(1) पालनार्थ आणि सदर कायदा कलम 13(12) सह हितसंबंध सुरक्षा (अंमलबजावणी) नियम 3 अनुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधित कर्जदार यांना त्यांच्या खात्यासमोर नमूद केलेली रक्कम सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सदर सूचनेमध्ये खाली नमूद केलेली प्रत्येक खात्यासमोर दर्शविलेली रक्कम परतफेड करण्याकरीता प्रत्येक खात्यासमोर दर्शविलेल्या तारखेस मागणी सूचना दिलेली आहे. याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्ते संबंधात कोणताही व्यवहार करू नये व तसा कोणताही व्यवहार केल्यास त्यावर करारानुसार ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचा सदर थकीत रक्कम व करारानुसारचे व्याज या रकमेचा भार राहील. सदर मालमत्तेच्या पुनर्प्राप्तीकरीता सदर कायदा कलम 13 चे पोट-कलम (8) कडे कर्जदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र./ कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार यांची नावे	मागणी सूचना तारीख व रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाण ठेवलेल्या मिळकतीचे वर्णन
1.	एलएक्सडीएयु-00315-160018052 प्रमोदकुमार नागेश वाघमोडे आणि कमल नागेश वाघमोडे	14/12/2018 रू. 876368.40 करीता	16/06/2022	स. नं.26/1बी/1, गोपाळवाडी ॲम्बोन्स हॉटेलच्या मागे, जिजामातानगर, कुरकुंभ रोड, दौंड, ४१३८०१-पुणे, महाराष्ट्र
2.	एलएक्सडीएयु-00416-170050856 सोमनाथ नारायण नरूटे आणि तात्याराम कुंडलिक नरूटे	15/12/2020 रू. 1066179/- करीता	16/06/2022	मिळकत क्र. 419, काजड, नरूटे वस्ती, काजड अकोले रोड शेजारी, इंदापूर, पुणे, महाराष्ट्र-413103

स्थळ : महाराष्ट्र,
दिनांकित : 22/06/2022
(सही/-)
- प्राधिकृत अधिकारी
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल. (ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि.)

National Centre for Radio Astrophysics
TATA INSTITUTE OF FUNDAMENTAL RESEARCH
Savitribai Phule Pune University Campus, Ganeshkhind, Pune - 411 007.

Corrigendum- 1

Refer our Tender Notice No.01/2022-2023 for Rate contract for repairs of ACs at GMRT, Khodad and GMRT Housing Colony Narayangaon, Tal.Junnar, Dist. Pune 410504, due dates extended as under:

Downloading of Tender	Extended upto : 12.07.2022, upto 18.00 hrs
Due date for Submission of Tender	Extended upto : 19.07.2022, upto 18.00 hrs.
Date for Opening of Techno Commercial Bid (Part I). (If sufficient bids are received).	20.07.2022 at 14.30 hrs.

For details visit: website: http://www.ncra.tifr.res.in/ncra/ncra1/public-tenders-1

किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड
Kirloskar Ferrous
किर्लोस्कर ग्रुप कंपनी
नोंदणीकृत कार्यालय: १३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे - ४११ ००३, महाराष्ट्र (भारत)
CIN: L27101PN1991PLC063223

सभासदांसाठी सूचना

किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड (कंपनी) च्या सभासदांना कळविण्यात येते की ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हिसी) किंवा अन्य दृकश्राव्य सुविधेद्वारे (ओएव्हीएम), तसेच कंपनी कायदा २०१३ (कायदा) यातील बदललेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेल्या दि. ८ एप्रिल २०२० चे साधारण परिपत्रक क्र.१४/२०२०, दि. १३ एप्रिल २०२० चे साधारण परिपत्रक क्र. १७/२०२०, दि. ५ मे २०२० रोजीचे साधारण परिपत्रक क्र. २०/२०२० आणि दि. ५ मे २०२२ चे साधारण परिपत्रक क्र. २/२०२२ (एकत्रीतपणे एमसीए परिपत्रके) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाची (सेबी) नियमावली २०१५, यातील बदल, जारी केलेल्या दि. १२ मे २०२० रोजीच्या परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 आणि दि. १३ मे २०२२ रोजीच्या परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 (एकत्रीत पणे सेबी परिपत्रके) नुसार घेण्यात येणार आहे.

एमसीए आणि सेबी परिपत्रकामध्ये मान्यता दिल्याप्रमाणे एजीएमची सूचना आणि २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनी किंवा रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजंट (लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) किंवा त्यांचे डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे नोंदविले आहेत अशांना पाठविले जातील व तसेच तेथील दस्तऐवज कंपनीच्या www.kirloskarferrous.com आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com संकेत स्थळावर पण उपलब्ध असतील.

इलेक्ट्रॉनिक मतदानाची आणि व्हीसी किंवा ओएव्हीएमची सुविधा वापरून एजीएम मध्ये हजर राहण्याची प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये दिलेली आहे. ज्या सभासदांना एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मिळाले नसतील अशा सभासदांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी आपले अद्ययावत ई-मेल पत्ते आणि/किंवा बँक खात्यांची माहिती खालीलप्रमाणे द्यावी:

ज्या सभासदांकडे भौतिक स्वरुपात समभाग असतील त्यांच्याकरिता	सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांनी https://linkintime.co.in/home-KYC.html मध्ये दिलेली माहिती वाचून आणि पूर्ण माहिती भरलेल्या, स्वाक्षरी केलेल्या फॉर्म ISR-1 च्या प्रति आणि इतर संबंधित असलेले फॉर्मस् आणि लागू असलेले दस्तऐवज रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अक्षय कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. २०२, दुसरा मजला, ढोले पाटील रोड, गणपती मंदिराजवळ, पुणे – ४११ ००१ येथे पाठवावेत.
ज्या सभासदांकडे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात समभाग असतील त्यांच्याकरिता	अद्ययावत ई-मेल पत्ता किंवा/आणि लाभांश मिळण्यासाठी बँक खात्याची माहिती देण्यासाठी कृपया आपल्या डिपॉझिटरी पार्टिसीपंट (डिपी) यांच्याशी संपर्क साधावा.

किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रिज लिमिटेड करिता
सही/-
मयुरेश घारपुरे
कंपनी सचिव

दिनांक : २१ जून २०२२
स्थळ : पुणे

• दूरध्वनी : +९१ २० ६६०८४६४५ • दूरभाष: +९१ २० २५८१३२०८
• ई-मेल : kflinvestor@kirloskar.com • संकेतस्थळ: www.kirloskarferrous.com

Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by 'Kirloskar Proprietary Limited' and 'Kirloskar Ferrous Industries Limited' is the Permitted User

ॲक्सिस बँक लि.
शाखा : स्टर्लिंग प्लाझा, तळ मजला, साई पेट्रोल पंपासमोर, जे. एम. रोड, पुणे - ४११ ००४
नोंदणीकृत कार्यालय : 'त्रिशूल', ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन एलिस ब्रिजजवळ, अहमदाबाद ३८०००६

ताबा नोटीस
रुल ८(१)
स्थावर मालमत्तांकरीता

ज्याअर्थी **ॲक्सिस बँक लि.**चे अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ च्या रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांना सदर कायद्याच्या सेक्शन १३(२) अंतर्गत त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी. कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) रुल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/ जामीनदार / गहाणदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा सदर नमूद तारखांना **प्रतिकात्मक ताबा घेतला आहे**. विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि.**, यांना खाली नमूद केलेल्या येणे असलेल्या रकमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांची नावे आणि पत्ते	येणे रक्कम रूपये	मागणी नोटीसीची तारीख / ताबा घेतल्याची तारीख
१	**१) अशोक भगवानराव दीक्षित, २) सरला अशोक दीक्षित,** मिनी मार्केट जवळ, इंद्रायणी नगर, १९/७, अवंती को-ऑप. हौसिंग सोसायटी, स.नं. २, भोसरी, पुणे-४११०२६.	रु. १९,४५,८९०.००/- (रूपये एकोणीस लाख पंचेचाळीस हजार आठशे नव्वद फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट / युनिट नं. ७ चा सर्वसामाईक भाग, बिल्डींग नं. १९, सेक्टर नं. २, शेड्यूल नं. ३, अवंती हौसिंग सोसायटी, गांव भोसरी, ता. हवेली, पुणे.		
२	**१) एकनाथ वामनराव सूर्यवंशी, २) कल्पना एकनाथ सूर्यवंशी,** उद्धव निवास, स.नं. ४२/१/३, फ्लॅट नं. ०१, हरी ओम दूध डेअरी लेन, पिंपळे निलख, पुणे-४११०२७. **तसेच :** फ्लॅट नं. ए-५०८, श्री गणेश हिल व्ह्यू, स.नं. ३८०/१/१, चऱ्होली बु., पुणे-४१२१०५.	रु. ३३,५७,७००.००/- (रूपये तेहेतीस लाख सत्तावन्न हजार सातशे फक्त) दि. २८/०१/२०२२ रोजी (दि. २८/०१/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २९/०१/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२८/०१/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट नं. ए-५०८ चा सर्वसामाईक भाग, श्री गणेश हिल व्ह्यू, स.नं. ३८०/१/१, चऱ्होली बु., पुणे-४१२१०५. (क्षेत्रफळ ५२.०२ चौ.मी.)		
३	**१) आशिष चांगदेव कवडे, २) अश्विनी आशिष कवडे,** द्वारा : के.जे. तांबोळी, फ्लॅट नं. ५, वृंदावन कॉलनी, रानमळा हॉटेलसमोर, वाल्हेकरवाडी रोड, चिंचवड, पुणे-४११०३३. **तसेच :** अंकलेश्वर वॉर्ड २, अंकलेश्वर गेट, चंद्रपूर-४४२४०२. **तसेच :** फ्लॅट नं. ए-१०३, स.नं. ४९४, श्री जलाराम पार्क, नगरपरिषद शाळा क्र. ४ जवळ, जलाराम मंदिर, चऱ्होली खुर्द, ता. खेड, पुणे.	रु. १४,३०,८१०.००/- (रूपये चौदा लाख तीस हजार आठशे दहा फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट / युनिट नं. ए-१०३ चा सर्वसामाईक भाग, चटई क्षेत्रफळ ४३४.५४ चौ.फू. आणि टेरेसचे क्षेत्रफळ ६५.६६ चौ.फू. तसेच सर्व फिटींग्ज, फिक्श्चर्स आणि मोचीसुविधांसहीत, 'श्री जलाराम पार्क' प्रोजेक्ट, गट नं. ४९४, प्लॉट नं. १-१२ आणि प्लॉट नं. १९-३७ वर बांधण्यात आलेले, चऱ्होली खुर्द, ता. खेड, पुणे येथे		
४	**१) नरसिंह कौंडीन्य, २) दिपा कौंडीन्य,** प्लॉट नं. १२, फ्लॅट नं. ३०१, बिरादार बिल्डींग, सेक्टर ४, पीसीएनटीडीए, संत नगर, साईनाथ हॉस्पिटलमागे, पुणे-४११०२६. **तसेच :** फ्लॅट नं. ए-६०३, शंकेश्वर क्रिम्सन, गट नं. ५२४, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी, शिव रोड, चिखली, पुणे-४१२११४. **तसेच :** कृतिका रेसिडेन्सी, सेक्टर नं. ६, मोशी प्राधिकरण, ट्रॅफिक पार्कच्या पुढे, संतनगर, मोशी आळंदी रूरल, पुणे-४१२१०५.	रु. २७,७२,१०३.००/- (रूपये सत्तावीस लाख बहात्तर हजार एकशे तीन फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट नं. ए-६०३ चा सर्वसामाईक भाग, क्षेत्रफळ ५३८.७३ चौ.फू. म्हणजेच ५०.०५ चौ.मी., लगतच्या बंदिस्त/मोकळ्या बाल्कनीचे क्षेत्रफळ ५४.०३ चौ.फू. म्हणजेच ५.०२ चौ.मी. आणि त्याच लेव्हलवरील टेरेसचे क्षेत्रफळ ७९.९७ चौ.फू. म्हणजेच ७.४३ चौ.मी., 'शंकेश्वर क्रिम्सन' प्रोजेक्ट, गट नं. ५२४, गांव चिखली, ता. हवेली, पुणे येथे स्थित.		
५	**१) गुरूप्रसादराव विश्वनाथ स्वामी, २) भाग्यज्योती गुरूप्रसाद स्वामी,** प्लॉट नं. ३२, गट नं. ३२३, शिवपार्वती हौसिंग सोसायटी, साने चौक, मोरे वस्ती, चिखली, पुणे-४१२११४. **तसेच :** फ्लॅट नं. ३०२, समृद्धी रेसिडेन्सी, गट नं. ३५, सावता माळी मंदिराजवळ, ऑफ आळंदी मोशी रोड, डुडुळगांव, पुणे-४१२१०५.	रु. २१,९४,७७०.००/- (रूपये एकवीस लाख चौऱ्याण्णव हजार सातशे सत्तर फक्त) दि. १५/०१/२०२२ रोजी (दि. १५/०१/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. १६/०१/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२८/०१/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : रहिवासी युनिट / फ्लॅट नं. ३०२ चा सर्वसामाईक भाग, ३ रा मजला, चटई क्षेत्रफळ ३७.४० चौ.मी. म्हणजेच ४०२.४४ चौ.फू. तसेच टेरेसचे क्षेत्रफळ ६.७१ चौ.मी. म्हणजेच ७२.२९ चौ.फू. आणि देण्यात आलेल्या एका कार पार्किंगसहीत, 'समृद्धी रेसिडेन्सी', गट नं. ३५, गांव डुडुळगांव, ता. हवेली, पुणे येथे स्थित.		
६	**१) मोना विकास कांबळे, २) विकास दिलिप कांबळे,** फ्लॅट नं. ७, विंग ए, सुखवानी एन्क्लेव्ह, बाघेरे कॉलनी, गणपती मंदिराजवळ, पिंपरीगांव, पिंपरी, पुणे-४११०१७. **तसेच :** विकास कांबळे यांची पत्नी, रिव्हर रोड, बौद्ध नगर, वॉटर टॅंकजवळ, पुणे-४११०१७. **तसेच :** फ्लॅट नं. ए-१११०, कोर्टयार्ड १५, गट नं. ७६९, कुडाळवाडी, चिखली, पिंपरी-चिंचवड, ता. हवेली, पुणे-४११०६२.	रु. २४,९२,३८६.००/- (रूपये चोवीस लाख ब्याण्णव हजार तीनशे शहाऐंशी फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट नं. ए-१११० चा सर्वसामाईक भाग, कोर्टयार्ड १५, गट नं. ७६९, कुडाळवाडी, चिखली, पिंपरी-चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे-४११०६२. (क्षेत्रफळ ३५.६८ चौ.मी.)		
७	**१) ज्योती अप्पासाव उभारे, २) अप्पासाव बापूराव उभारे,** फ्लॅट नं. सी-४०८, कल्प रेसिडेन्सी, गट नं. १९२, १९३, चाकण शिक्रापूर रोड, मेदनकरवाडी, पुणे-४१०५०१. **तसेच :** फ्लॅट नं. सी-३०७, कल्प रेसिडेन्सी चाकण, गट नं. १९२, हॉटेल तिरंगा जवळ, ऑफ चाकण शिक्रापूर रोड, मेदनकरवाडी, ता. खेड, पुणे.	रु. १७,८०,६६२.००/- (रूपये सतरा लाख ऐंशी हजार सहाशे बासष्ट फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट नं. सी-३०७ चा सर्वसामाईक भाग, चटई क्षेत्रफळ ४०.४८ चौ.मी., ड्राय बाल्कनी / टेरेसचे क्षेत्रफळ ६.४६ चौ.मी., 'कल्प रेसिडेन्सी' प्रोजेक्ट, गट नं. १९२ (जुना गट नं. १२६८) आणि १९३/बी (जुना गट नं. १२६८/बी) वर बांधण्यात आलेला, गांव मेदनकरवाडी, ता. खेड, पुणे येथे स्थित.		
८	**१) महादेवी संजीव काळे २) योगेश चंद्रकांत गाडे,** फ्लॅट नं. २०६, रुबी बिल्डींग, इंद्रायणी कॉलेज जवळ, तळेगांव दाभाडे, पुणे-४१०५०७. **तसेच :** प्लॉट नं. ७४, विघ्नेश्वर क्लासिक अपार्टमेंट, तळेगांव चाकण रोड, तळेगांव दाभाडे, पुणे-४१०५०७. **तसेच :** फ्लॅट नं. ए-१००३, टेरा ग्रीन्स, स.नं. १११, सांगवडे, मावळ, पुणे-४१२१०१. **तसेच :** द्वारा चंद्रकांत गाडे, कमल निवास, स.नं. ६१, बापदेव नगर, सिद्धीविनायक कॉलनी, देहू रोड, किवळे, पुणे-४१२१०१.	रु. २५,७७,००७.००/- (रूपये पंचवीस लाख सत्त्याहत्तर हजार सात फक्त) दि. २२/०३/२०२२ रोजी (दि. २२/०३/२०२२ पर्यंतचे लागू केलेल्या व्याजासहीत) आणि त्यावरील दि. २३/०३/२०२२ रोजी करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज यासहीत	२९/०३/२०२२ १८/०६/२०२२
	स्थावर मालमत्तेचा तपशील : फ्लॅट नं. ए-१००३ चा सर्वसामाईक भाग, चटई क्षेत्रफळ ३२.७५ चौ.मी., 'टेरा ग्रीन्स' प्रोजेक्ट, गट नं. १११ आणि ११३ वर बांधण्यात आलेला, गांव सांगवडे, ता. मावळ, पुणे येथे स्थित.		

दिनांक : १८/०६/२०२२
स्थळ : पुणे
अधिकृत अधिकारी,
ॲक्सिस बँक लि.

जाहिर सुचना

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, लाईफ रिपब्लिक हे **मे. कोलते पाटील इंटिग्रेटेड टाऊनशिप्स लिमिटेड** (पूर्वीचे नाव – मे. कोलते पाटील आय-वेन टाऊनशिप (पुणे) लिमिटेड) नवीन स.नं. ८६ (जुना स.नं. ७८/१ (पार्ट), ८० पार्ट, ८१/१/अ पार्ट, ८१/१/ब, ८१/२, ८२/१ पार्ट, ८२/२, ८२/३, ८३ पार्ट, ८६, १०७/१(पार्ट), १०७/२ पार्ट, ११०/१अ (पार्ट), ११०/२ (पार्ट), ११०/१/ब पार्ट, १११/१अ/१ पार्ट, १११/१अ/२ पार्ट, १११/१ब पार्ट, १११/२ पार्ट, ११२/१(पार्ट), ११४/१(पार्ट), ११३/१अ/१ पार्ट, ११४/२, ११३/१अ/१ब/१ पार्ट, ११३/१अ/१ब, ११३/२, ११३/१अ/२, ११३/१ब, ११५/१(पार्ट), ११७ पार्ट, ११८/१ पार्ट, १२०/३, १२१ पार्ट, १२२, १२३) १०२/१, ८५/१) नविन स.नं. ७४/ब (जुना स.नं. ७४/२, ७४/९/२(पार्ट), ७४/३), ७७/१ (पार्ट), ७७/२, ७८/१ (पार्ट), ८० पार्ट, ८१/१/१ (पार्ट), ८२ पार्ट, ८३ (पार्ट), १०७/२ पार्ट, ११०/ब पार्ट, १११/१अ/१ पार्ट, १११/१अ/२ पार्ट, १११/१ब पार्ट, १११/२ पार्ट, ११३/१अ/१ पार्ट, ११३/१अ/१ब/१ पार्ट, ११५/१ पार्ट, ११७ पार्ट, ११८/१ पार्ट, १२१ पार्ट, ७७/१ पार्ट, ७७/२, ७८/१ पार्ट, ८०/१ पार्ट, ८३/२ पार्ट, ९०/७/१, ९०/९, ९१/१(पार्ट), ९१/२, ९१/३, ९१/४(पार्ट), ९१/५, ९१/६, ९१/७(पार्ट), ९१/८, ९२/१अ, ९२/२अ(पार्ट), ९२/३, ९२/४, ९२/५, ९२/६(पार्ट), ९२/७, ९२/८(पार्ट), ९३, ९५, ९६/१/१(पार्ट), ९६/१/२(पार्ट), ९६/१/३, ९६/२/१, ९६/२/२(पार्ट), ९६/३(पार्ट), ९६/४(पार्ट), ९६/५/२(पार्ट), ९८(पार्ट), ९८/२, १००/१/१, १००/१/२, १००/२, १०१(पार्ट), ११२/१(पार्ट), ११२/२, ११४/१(पार्ट), ११९, १२०/१, १२०/२, १२०/४/१, १२०/४/२, १२४/१/१, १२४/१/२, १२४/२, १२५/१, १२६/१(पार्ट), १२६/२, १२७/१/१, १२७/१/२(पार्ट), ९९/१/२ पार्ट, ११३/१अ/१ब/१ब पार्ट, ९०/१० पार्ट, १३१/८ पार्ट, १३१/९, १३१/१०, १०२/२ पार्ट, १२६/२/१, ७३/९, ८७/२, २४/३, २४/५, २५/१, २५/२, २६/१, २६/२, २६/४, २६/५, २६/६, २७/१, २७/३(पार्ट), ६९/१, ६९/२/१, ६९/२/२, ६९/२/३, ६९/२/४, ६९/२/५, ६९/२/६, ६९/२/७, ६९/२/८, ७१(पार्ट), ७४/७(पार्ट), ७४/८, ७४/९/१ पार्ट.) गाव **जांबे, नेरे व मारूंजी,** तालुका मुळशी, जिल्हा पुणे, राज्य महाराष्ट्र. भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालय वन व हवामान बदल (SEIAA) विभागाकडून पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र क्र. **EC22B039MH138203** देण्यात आले आहे. ना हरकत प्रमाणपत्र पर्यावरण विभागाच्या **www.parivesh.nic.in** या संकेतस्थळावर पाहता येईल.

आषाढी वारीदरम्यान पाऊस, हवामान बदलांची संकेतस्थळाद्वारे माहिती

हवामान विभागाचा पहिल्यांदाच पुढाकार



पुणे : आषाढी वारीच्या काळात वारकऱ्यांना पाऊस आणि हवामान बदलांची माहिती देण्यासाठी हवामान विभागाकडून पहिल्यांदाच विशेष पुढाकार घेण्यात आला आहे. हवामान विभागाच्या 'आषाढी वारी २०२२' या उपक्रमाअंतर्गत आषाढी एकादशीपर्यंत हवामानाशी संबंधित माहिती वेळोवेळी संकेतस्थळाद्वारे दिली जाणार आहे.

जवळपास तीनशेहून अधिक वर्षांची परंपरा असलेल्या आषाढी वारीमध्ये गेली दोन वर्षे करोनाच्या प्रादुर्भावामुळे खंड पडला. त्यामुळे गेली दोन वर्षे विठूरायाच्या भेटीसाठी आसावलेले लाखो वारकरी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसह राज्याच्या विविध भागांतून आषाढीला पंढरीत दाखल होणार आहेत. संत तुकाराम महाराज पालखीने देहूतून, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखीने आळंदीतून प्रस्थान ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील हवामान संशोधन आणि सेवा विभाग आणि मुंबईतील प्रादेशिक हवामान केंद्र यांनी पुढाकार घेऊन वारकऱ्यांना हवामानाची माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यात वारी मार्गावरील हवामान आणि पावसाचा अंदाज दिला जाईल. पाऊस आणि हवामानासंदर्भातील माहिती https://210.212.167.217/ index. php आणि http:// www. imdpune. gov. in/ संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. वारकऱ्यांना या संकेतस्थळाद्वारे हवामानाशी संबंधित माहिती मिळू शकेल.

Punit Balan Group

हवामान अंदाज विभागाचे प्रमुख डॉ. अनुपम कश्यपी म्हणाले, 'गेली दोन वर्षे आषाढी वारी होऊ शकली नाही. त्यामुळे यंदा लाखो वारकरी वारीमध्ये सहभागी होणार आहेत. हवामान, पावसाची माहिती वारकऱ्यांना मिळत राहावी या दृष्टीने विशेष हवामान सेवा हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. काही वर्षांपूर्वी उज्जैनमध्ये झालेल्या कुंभमेळ्यामध्ये ही संकल्पना राबवण्यात आली होती. आता आषाढी वारीनिमित्त हा उपक्रम राबवला जाणार आहे.

दिवसभरात वेळोवेळी हवामान आणि पावसाचा अंदाज दिला जाईल. तसेच पावसासंदर्भात काही इशारा असल्यास त्याबाबतही माहिती दिली जाईल, जेणेकरून वारकऱ्यांना त्यांचे मार्गक्रमण, निवारा या बाबत ठरवता येईल. पुढील दोन दिवसांत पुणे आणि सोलापूर जिल्ह्यात पाऊस सक्रिय होणार आहे.

आषाढी वारीसाठी प्रथमच हवामान सेवा उपक्रम राबवला जात आहे. रडार, उपग्रहांच्या मदतीने हवामानशी संबंधित अद्ययावत वारकऱ्यांना दिली जाईल. त्यामुळे हवामान सेवा लाखो वारकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असे हवामान संशोधन आणि सेवा विभागाचे प्रमुख डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले.

